RELIANCE

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय: एच ब्लॉक, 1 ला मजला, धीरुभाई अंबानी नॉलेज सिटी,
नवी मुंबई 400 710
वेबसाईट : www.rinfra.com

# सार्वजनिक सूचना

## आर्थिक वर्ष 2012-13 ते आर्थिक वर्ष 2015-16 या कालावधीसाठी बहुवर्षीय दरपत्रकाच्या मान्यतेसाठी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड–वितरण व्यवसाय (आरइन्फ्रा–डी) यांनी सादर केलेल्या याचिकेवरील हरकती/सूचना (2013 चे प्रकरण क्र. 9)

1. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड - वितरण व्यवसाय (आरइन्फ्रा-डी) यांनी आव 2012-13 ते आव 2015-16 या कालावधीसाठी बहुवर्षीय दरपत्रकास मान्यता मिळण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे, विद्युत अधिनियम 2003 च्या कलम 61 व 62 अंतर्गत व एमईआरसी (बहुवर्षीय दरपत्रक) नियमावली, 2011 च्या नियम 8 अंतर्गत आणि माननीय आयोगाने 2011 च्या प्रकरण क्र. 158 मध्ये दिलेल्या निर्देशांनुसार याचिका दाखल केलेली आहे. माननीय आयोगाने ही याचिका दिनांक 19 फेब्रुवारी 2013 रोजी दाखल करून घेतलेली आहे आणि आरइन्फ्रा-डीला या याचिकेचा सारांश असलेली सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिलेले आहेत.
2. माननीय आयोगाने आरइन्फ्रा-डीच्या बहुवर्षीय दरपत्रक व्यवसाय योजनेला मंजुरी देत दिनांक 23 नोव्हेंबर 2012 रोजी 2011 च्या प्रकरण क्र. 158 मध्ये, आव 2012-13 ते आव 2015-16 या दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी आदेश दिलेला आहे आणि आरइन्फ्रा-डीला दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी एमईआरसी (बहुवर्षीय दरपत्रक) नियमावली, 2011 नुसार आणि माननीय आयोगाने मंजूर केलेल्या बहुवर्षीय दरपत्रक व्यवसाय योजनेनुसार, बहुवर्षीय दरपत्रक नियमावली याचिका दाखल करण्याचे निर्देश दिलेले आहेत.
3. आरइन्फ्रा-डीने चार वर्षांसाठी म्हणजेच आव 2012-13 पासून आव 2015-16 पर्यंत मागणीचा अंदाज वर्तविलेला आहे. आरइन्फ्रा-डीने आपल्या स्वत:च्या ग्राहकांसाठी आणि चेंजओव्हर ग्राहकांसाठी स्वतंत्रपणे पूर्वानुमान तयार केलेले आहे:

क. स्वत:चे ग्राहक: स्वत:चे ग्राहक म्हणजे असे ग्राहक जे आरइन्फ्रा-डीचे वायर्स नेटवर्कचा वापर करतात, तसेच आरइन्फ्रा-डीकडून वीज प्राप्त करतात.

ख. चेंजओव्हर ग्राहक: चेंजओव्हर ग्राहक म्हणजे असे ग्राहक जे आरइन्फ्रा-डीच्या वायर्स नेटवर्कचा वापर करतात, पण पुरवठ्याच्या सामायिक क्षेत्रात इतर परवानाधारकांकडून वीज प्राप्त करतात.

4. संवर्गनिहाय विक्रीचे पूर्वानुमान

आरइन्फ्रा-डीकडून टीपीसी-डीकडे स्थलांतरित होणाऱ्या ग्राहकांमुळे, आरइन्फ्रा-डीच्या मागील काळातील आकडेवारीत चेंजओव्हर ग्राहकांनी वापरलेल्या विजेचाही समावेश आहे. 2011 च्या प्रकरण 151 मध्ये दिलेल्या आदेशाच्या परिणामामुळे, ग्राहकांचे बदलून जाणे (चेंजओव्हर) हे सध्या फक्त 0-300 निवासी संवर्गापुरते मर्यादित आहे. म्हणून, आरइन्फ्रा-डीच्या स्वत:च्या विक्रीवर झालेला परिणाम मागील कलांशी तुलना करता भविष्यात वेगळा असेल.

स्थलांतराचा व त्यायोगे चेंजओव्हर विक्रीचा आरइन्फ्रा-डीच्या स्वत:च्या विक्रीवर होणारा परिणाम अचूकपणे विचारात घेण्यासाठी, दुसऱ्या नियंत्रण कालावधीमध्ये आरइन्फ्रा-डीच्या स्वत:च्या विक्रीचा अंदाज वर्तविण्यासाठी खालील दृष्टिकोन अवलंबिलेला आहे.

- टप्पा 1: प्रत्येक ग्राहक संवर्गासाठी टीपीसी-डीसह पुरवठ्याच्या सामायिक क्षेत्रासह (स्थलांतरित/चेंजओव्हर ग्राहकांना बहाल करण्याजोग्या विक्रीसहित) आरइन्फ्रा-डीच्या वितरण क्षेत्रातील एकूण विक्रीचा अंदाज.
- टप्पा 2: माननीय आयोगाने 2011 च्या प्रकरण 151 मध्ये दिलेल्या आदेशाचा परिणाम विचारात घेऊन, ग्राहक संवर्गनिहाय चेंजओव्हर विक्रीचा अंदाज.
- टप्पा 3: वरील टप्पा 1 आणि 2 मधील फरक असलेला आरइन्फ्रा-डीच्या स्वत:च्या विक्रीचा अंदाज.

मागील वृद्धीचे कल लक्षात घेऊन एकूण विक्रीचा अंदाज वर्तविलेला आहे. संबधित ग्राहक संवर्गाला केलेल्या विक्रीच्या पाच वर्षांच्या सीएजीआरचा उपयोग विक्रीचा अंदाज वर्तविण्यासाठी केलेला आहे. चेंजओव्हर विक्रीचा अंदाज पुढील गोष्टींचा परिणाम विचारात घेऊन वर्तविलेला आहे - 1) सध्याच्या चेंजओव्हर ग्राहकांना केलेली विक्री 2) अतिरिक्त चेंजओव्हर ग्राहकांना केलेली विक्री 3) 22 ऑगस्ट 2012 रोजीनुसार चेंजओव्हरसाठी आलेल्या प्रलंबित अर्जांसाठीची विक्री 4) 2011 च्या प्रकरण 151 चा परिणाम, ज्यात असे गृहीत धरण्यात आलेले आहे की, टीपीसी-डी, चेंजओव्हर ग्राहकांना 11 निश्चित केलेल्या समूहांमध्ये/प्रभागांमध्ये स्वत:च्या नेटवर्कमधून सेवा पुरवील.

त्यानंतर आरइन्फ्रा-डीची स्वत:ची विक्री, एकूण विक्री आणि चेंजओव्हर विक्री यांतील फरक लक्षात घेऊन निश्चित केली जाते. नवीन रेल्वे संवर्गातील मुंबई मेट्रो एक प्रकल्पाला केलेली अतिरिक्त विक्री आणि आरइन्फ्रा-पारेषण ईएचव्ही उपकेंद्रांना केलेली विक्री आरइन्फ्रा-डीच्या स्वत:च्या विक्रीत समाविष्ट केलेली आहे. आरइन्फ्रा-डीच्या स्वत:च्या विक्रीचा अंदाज वर्तविताना डीएसएम उपाययोजनांचा परिणाम विचारात घेतलेला आहे.

**तक्ता 1: संवर्गनिहाय विक्रीचे पूर्वानुमान (मेयू) (चेंजओव्हर विक्री)**

| ग्राहक संवर्ग | आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|
| एलटी | | | | |
| एलटी 1-दारिद्र्यरेषेखालील | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| एलटी -1 निवासी (सिंगल फेज) | | | | |
| 0-100 | 36.40 | 26.26 | 8.78 | 11.56 |
| 101-300 | 209.99 | 126.38 | 37.87 | 46.72 |
| 301-500 | 119.27 | 55.13 | 13.06 | 13.32 |
| 500 व त्यावरील | 107.03 | 49.48 | 11.72 | 11.95 |
| एलटी-1 निवासी थ्री फेज | | | | |
| 0-100 | 2.21 | 1.36 | 0.57 | 0.69 |
| 101-300 | 49.12 | 27.95 | 10.94 | 12.53 |
| 301-500 | 84.64 | 42.28 | 14.53 | 14.82 |
| 500 व त्यावरील | 328.62 | 164.15 | 56.40 | 57.53 |
| एलटी 2 (अ) 0-20 किवॅ | 410.31 | 194.28 | 51.84 | 52.87 |
| एलटी 2 (ब) - 20-50 किवॅ | 109.84 | 54.60 | 18.09 | 18.46 |
| एलटी 2 (क) - 50 किवॅ वरील | 387.81 | 210.29 | 92.27 | 94.12 |
| एलटी 3-एलटी औद्योगिक 20 किवॅपर्यंत | 62.09 | 25.60 | 1.55 | 1.58 |
| एलटी 4-एलटी औद्योगिक 20 किवॅ वरील | 309.45 | 127.24 | 7.49 | 7.64 |
| एलटी-5 : एलटी-जाहिराती आणि होर्डिंग्ज | 0.16 | 0.10 | 0.05 | 0.05 |
| एलटी 6: एलटी-पथदीप | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| एलटी-7 (अ): एलटी-तात्पुरता पुरवठा धार्मिक | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| एलटी-7 (ब): एलटी-तात्पुरता पुरवठा इतर | 0.83 | 0.41 | 0.13 | 0.14 |
| एलटी 8: दहनभूमी आणि दफनभूमी | 0.32 | 0.16 | 0.05 | 0.05 |
| एलटी 9: एलटी-कृषी | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| एकूण एलटी | 2218.09 | 1105.66 | 325.36 | 344.03 |
| एचटी | | | | |
| एचटी 1: एचटी-औद्योगिक | 271.85 | 131.28 | 39.13 | 39.91 |
| एचटी 2 : एचटी-वाणिज्यिक | 569.58 | 318.42 | 154.09 | 157.18 |
| एचटी 3: एचटी-गृहसंस्था समूह | 16.60 | 10.98 | 7.34 | 7.49 |
| एचटी 4 : एचटी-तात्पुरता पुरवठा | 0.18 | 0.16 | 0.15 | 0.15 |
| एचटी-रेल्वे (नवीन संवर्ग) | | 0.00 | 0.00 | 0.00 |
| एकूण एचटी | 858.21 | 460.84 | 200.71 | 204.72 |
| एकूण चेंजओव्हर विक्री | 3076.30 | 1566.50 | 526.07 | 548.76 |

**तक्ता 2: संवर्गनिहाय विक्रीचे पूर्वानूमान (मेयू): आरइन्फ्रा-डी स्वत:ची विक्री**

| आरइन्फ्रा-डी स्वत:ची विक्री | आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|
| एलटी | | | | |
| एलटी 1-दारिद्र्यरेषेखालील | 0.04 | 0.04 | 0.05 | 0.05 |
| एलटी -1 निवासी (सिंगल फेज) | | | | |
| 0-100 | 1,757.10 | 1,788.26 | 1,817.57 | 1,847.94 |
| 101-300 | 1,145.88 | 1,116.92 | 1,077.43 | 1,036.34 |
| 301-500 | 167.56 | 173.65 | 179.99 | 186.59 |
| 500 व त्यावरील | 59.00 | 61.79 | 64.71 | 67.74 |
| एलटी-1 निवासी थ्री फेज | | | | |
| 0-100 | 190.09 | 195.17 | 200.36 | 205.75 |
| 101-300 | 284.31 | 286.17 | 287.09 | 288.04 |
| 301-500 | 145.95 | 151.06 | 156.39 | 161.93 |
| 500 व त्यावरील | 236.71 | 246.92 | 257.60 | 268.66 |
| एलटी 2 (अ) 0-20 किवॅ | 1,282.71 | 1,343.51 | 1,412.06 | 1,483.80 |
| एलटी 2 (ब) - 20-50 किवॅ | 133.29 | 141.20 | 150.00 | 159.23 |
| एलटी 2 (क) - 50 किवॅ वरील | 218.03 | 233.99 | 253.45 | 274.34 |
| एलटी 3-एलटी औद्योगिक 20 किवॅपर्यंत | 120.49 | 123.65 | 127.36 | 131.18 |
| एलटी 4-एलटी औद्योगिक 20 किवॅ वरील | 184.40 | 191.30 | 198.44 | 205.81 |
| एलटी-5 : एलटी-जाहिराती आणि होर्डिंग्ज | 3.06 | 3.23 | 3.40 | 3.59 |
| एलटी 6: एलटी-पथदीप | 56.51 | 57.73 | 58.96 | 60.23 |
| एलटी-7 (अ): एलटी-तात्पुरता पुरवठा धार्मिक | 1.01 | 1.04 | 1.08 | 1.12 |
| एलटी-7 (ब): एलटी-तात्पुरता पुरवठा इतर | 91.72 | 94.93 | 98.26 | 101.70 |
| एलटी 8: एलटी-दहनभूमी आणि दफनभूमी | 0.85 | 0.88 | 0.90 | 0.94 |
| एलटी 9: एलटी-कृषी | 0.04 | 0.04 | 0.04 | 0.05 |
| एकूण एलटी | 6,078.92 | 6,211.67 | 6,345.36 | 6,485.21 |
| एचटी | | | | |
| एचटी1: एचटी-औद्योगिक | 81.28 | 83.30 | 85.37 | 87.49 |
| एचटी 2 : एचटी-वाणिज्यिक | 160.06 | 214.25 | 274.59 | 341.21 |
| एचटी 3: एचटी-गृहसंस्था समूह | 22.03 | 22.49 | 22.96 | 23.45 |
| एचटी 4 : एचटी-तात्पुरता पुरवठा | 4.09 | 4.17 | 4.25 | 4.34 |
| एचटी-रेल्वे (नवीन संवर्ग) | 0.00 | 57.80 | 57.80 | 78.40 |
| एकूण एचटी | 267.44 | 382.00 | 444.97 | 534.88 |
| एकूण स्वत:ची विक्री | 6,346.36 | 6,593.68 | 6,790.34 | 7,020.09 |

**5. मागणीचे पूर्वानुमान**

**तक्ता 3: मागणीचे पूर्वानुमान**

| तपशील | एकक | संदर्भ | आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|---|---|
| विक्री (स्वत:ची+चेंजओव्हर) | मेयू | A | 9,422.66 | 8,160.17 | 7,316.40 | 7,568.84 |
| वितरणातील तोटा | % | B | 9.46% | 9.46% | 9.41% | 9.36% |
| पारेषण व वितरण सीमारेषेवरील थेट विक्री | मेयू | c=a/(1- b) | 10,407.18 | 9,012.78 | 8,076.39 | 8,350.45 |
| एचटी स्थलांतरित विक्री | मेयू | D | 858.21 | 460.84 | 200.71 | 204.72 |
| एचटी व्हिलिंग तोटा | % | E | 1.94% | 1.94% | 1.94% | 1.94% |
| एचटी पारेषण-वितरण सीमारेषेवरील ढोबळ ऊर्जा | मेयू | f=d/(1-e) | 875.19 | 469.95 | 204.68 | 208.77 |
| एलटी स्थलांतरित विक्री | मेयू | X | 2,218.09 | 1,105.66 | 325.36 | 344.03 |
| एलटी व्हिलिंग तोटा | % | Y | 9.00% | 9.00% | 9.00% | 9.00% |
| एलटी पारेषण-वितरण सीमारेषेवरील ढोबळ ऊर्जा | मेयू | z=x/(1-y) | 2,437.46 | 1,215.01 | 357.53 | 378.06 |
| पारेषण-वितरण सीमारेषेवरील एकूण खप | मेयू | g=c-f-z | 7,094.53 | 7,327.82 | 7,514.18 | 7,763.61 |
| राज्यांतर्गत पारेषण तोटा | % | H | 4.85% | 4.85% | 4.85% | 4.85% |
| निर्मिती व पारेषण सीमारेषेवरील मागणीनुसार डिलिव्हरी | मेयू | i=g/(1-h) | 7,456.15 | 7,701.33 | 7,897.19 | 8,159.34 |
| सरासरी मागणी | मेवॅ | j=(i/8760) X 1000 | 851.16 | 879.15 | 901.51 | 931.43 |
| भार घटक | | K | 68% | 68% | 68% | 68% |
| अत्युच्च मागणी | मेवॅ | l=j/k | 1,251.70 | 1,292.86 | 1,325.74 | 1,369.75 |

**6. शिल्लक ऊर्जा (मेयू)**

**तक्ता 4: शिल्लक ऊर्जा (मेयू)**

| तपशील | आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|
| निर्मिती व पारेषण सीमारेषेवरील मागणीनुसार डिलिव्हरी | 7,456.15 | 7,701.33 | 7,897.19 | 8,159.34 |
| ऊर्जास्रोत | | | | |
| डीटीपीएस | 3,997.37 | 3,787.60 | 3,787.60 | 3,798.13 |
| डब्ल्यूपीसीएल (मध्यम मुदत) | 1,935.96 | 1,935.96 | - | - |
| अभिजीत (मध्यम मुदत) | 409.53 | 409.53 | - | - |
| व्हीआयपीएल (मध्यम मुदत) | 997.76 | 997.76 | - | - |
| व्हीआयपीएल (दीर्घ मुदत) | - | - | 4,047.82 | 4,058.91 |
| नूतनीकरणयोग्य (आरपीओ) | 246.93 | 286.35 | 286.35 | 287.12 |
| अल्प मुदतीसाठी खरेदी | 514.53 | 746.44 | 493.34 | 631.09 |
| एकूण उपलब्ध ऊर्जा | 8,102.09 | 8,163.65 | 8,615.12 | 8,775.26 |
| घट/(अतिरीक्त) | (645.94) | (462.32) | (717.93) | (615.92) |

**7. वीजखरेदीचा खर्च**

**तक्ता 5: वीजखरेदीचा खर्च**

| तपशील | आव 12-13 | | | आव 13-14 | | | आव 14-15 | | | आव 15-16 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मेयू | कोटी रु. | रु./किवॅतास | मेयू | कोटी रु. | रु./किवॅतास | मेयू | कोटी रु. | रु./किवॅतास | मेयू | कोटी रु. | रु./किवॅतास |
| डीटीपीएस | 3,997 | 1,304 | 3.26 | 3,788 | 1,525 | 4.03 | 3,788 | 1,438 | 3.80 | 3,798 | 1,479 | 3.89 |
| वर्धा पॉवर (मध्यम मुदत) | 1,936 | 986 | 5.10 | 1,936 | 794 | 4.10 | | | | | | |
| अभिजीत एमएडीसी (मध्यम मुदत) | 410 | 197 | 4.81 | 410 | 178 | 4.35 | | | | | | |
| व्हीआयपीएल (मध्यम मुदत) | 998 | 498 | 4.99 | 998 | 512 | 5.13 | | | | | | |
| व्हीआयपीएल (दीर्घ मुदत) | | | | | | | 4,048 | 1,385 | 3.42 | 4,059 | 1,405 | 3.46 |
| नूतनीकरणयोग्य | 247 | 275 | 11.14 | 286 | 293 | 10.24 | 286 | 298 | 10.42 | 287 | 305 | 10.62 |
| अल्प मुदतीसाठी खरेदी | 515 | 237 | 4.60 | 746 | 354 | 4.74 | 493 | 241 | 4.88 | 631 | 318 | 5.03 |
| अतिरिक्त विक्रीपासून प्राप्त रक्कम | (646) | (196) | 3.03 | (462) | (144) | 3.12 | (718) | (231) | 3.21 | (616) | (204) | 3.31 |
| एसएलडीसी आकार | | 1 | | | 1 | | | 1 | | | 1 | |
| स्टँडबाय आकार | | 221 | | | 66 | | | 144 | | | 144 | |
| एकूण | 7,456 | 3,523 | 4.73 | 7,701 | 3,579 | 4.65 | 7,897 | 3,276 | 4.15 | 8,159 | 3,447 | 4.22 |

**8. भांडवली खर्च आणि भांडवलीकरण:**

आरइन्फ्रा-डीने प्रणालीची कमाल मागणी व त्यासोबत नवीन भाराशी संबंधित क्षेत्रांमधील अपेक्षित घडामोडी, अस्तित्वातील मालमत्तांच्या बदल्यात नवीन मालमत्ता, नवीन भारानुसार मजबुतीकरण आणि आधुनिकीकरण करणे, इत्यादींवर आधारित आव 2012-13 ते आव 2015-16 या कालावधीसाठी आपली भांडवली खर्चाची योजना तयार केलेली आहे. भांडवली खर्चाची योजना पारेषण पातळीवरील घडामोडींशी संबंध लक्षात घेऊन डिलिव्हरी पॉईंटस्पर्यंत जोडण्या आणि तेथे वीज मुक्त करण्यासाठी आवश्यक असलेल्या त्यापुढील पायाभूत सुविधांचे अंदाज वर्तविते.

आरइन्फ्रा-डीने, आयआयटी मुंबई (आयआयटीबी) यांनी केलेल्या अभ्यासावर आधारित मागणीच्या पूर्वानुमानाची एमवायटी कॅपेक्स योजना तयार करण्यासाठीचा आधार म्हणून वापर केलेला आहे. आयआयटी मुंबई यांनी कमाल मागणी व त्यासाठी आवश्यक भांडवली गुंतवणुकीची आकडेवारी प्राप्त करण्यासाठी गेल्या 17 वर्षांतील माहितीच्या आधारे, आरइन्फ्रा-डीची मागील काळातील मागणी, ग्रॉस डिस्ट्रिक्ट डोमेस्टिक प्रॉकडक्ट ग्रोथ (मुंबईसाठी जीडीडीपी) यांसारखी आकडेवारी आणि घटक व इतर घटकांचा उपयोग केला.

**तक्ता 6: आरइन्फ्रा-डीने वितरण नेटवर्कसाठी आव 2012-13 ते आव 2015-16 या कालावधीसाठी प्रस्तावित केलेला भांडवली खर्च आणि भांडवलीकरण** **(कोटी रु.)**

| एमईआरसीने मंजूर केलेली स्थिती | भांडवली खर्च | | | | भांडवलीकरण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 | आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
| डीपीआर | | | | | | | | |
| मंजूर डीपीआर | 286.08 | 439.68 | 405.37 | 408.11 | 355.11 | 339.99 | 382.06 | 455.35 |
| मंजुरीसाठी प्रलंबित सादर डीपीआर | 29.12 | 36.41 | 7.28 | 0.00 | 0.00 | 26.58 | 70.82 | 0.00 |
| बिगर-डीपीआर योजना | 19.42 | 30.10 | 38.29 | 41.22 | 10.01 | 25.45 | 40.78 | 42.34 |
| एकूण | 334.62 | 506.19 | 450.94 | 449.33 | 365.12 | 392.02 | 493.66 | 497.68 |

**9. प्रचालनात्मक घटक**

**तक्ता 7: प्रचालनात्मक घटक**

| तपशील | आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|
| वितरणातील तोटा (%) | 9.46% | 9.46% | 9.41% | 9.36% |

**10. नियामक मालमत्ता आणि नियामक मालमत्ता आकार**

3674.42 कोटी रुपये एवढ्या संकलित तफावतीची विभागणी आव 11-12 पर्यंत आरइन्फ्रा-डीचे स्वत:चे ग्राहक आणि चेंजओव्हर ग्राहक यांच्यामध्ये आरइन्फ्रा-डीच्या स्वत:च्या ग्राहकांना केलेली विक्री आणि चेंजओव्हर ग्राहकांना केलेली विक्री यांच्या प्रमाणात करण्याचे प्रस्तावित करीत आहे. ग्राहकांना मोठा धक्का बसू नये म्हणून, महसुलातील सदर तफावतीची वसुली आव 13-14 ते आव 18-19 या कालावधीत म्हणजेच आव 13-14 पासून सहा वर्षांच्या कालावधीत करण्याचे प्रस्तावित करीत आहे. नियामक मालमत्तांची वसुली आरइन्फ्रा-डीच्या स्वत:च्या ग्राहकांकडून आणि टपीसी-डीकडे स्थलांतरित होऊन गेलेल्या ग्राहकांकडून करावयाची असल्याने, आरइन्फ्रा-डीने या याचिकेत असे प्रस्तावित केलेले आहे की, नियामक मालमत्तांची वसुली स्वतंत्रपणे केली जाईल आणि किरकोळ दरपत्रकाबरोबर त्यांचे मिश्रण केले जाणार नाही.

**तक्ता 8: आव 2011-12 पर्यंत संकलित तफावत/नियामक मालमत्ता (कॅरिंग कॉस्टसह)**

| तपशील | महसुलातील तफावत (कोटी रु.) | कॅरिंग कॉस्ट (कोटी रु.) | एकूण (कोटी रु.) |
|---|---|---|---|
| माननीय आयोगाने 2011 च्या प्रकरण क्र. 180 मध्ये दिनांक 15 जून 2012 रोजी मंजूर केलेली महसुलातील संकलित तफावत/नियामक मालमत्ता | 1,795.37 | | |
| वजा: 2011 च्या प्रकरण 180 मध्ये समाविष्ट आव 10-11 ची महसुलातील तफावत | 436.73 | | |
| वजा: 2011 च्या प्रकरण 180 मध्ये समाविष्ट आव 11-12 ची महसुलातील तफावत | (145.32) | | |
| दुय्यम बेरीज - अ | 1,503.96 | 793.70 | 2,297.66 |
| अधिक: आरइन्फ्रा-डीच्या ट्रू अप याचिकेनुसार आव 10-11 ची महसुलातील तफावत | 551.47 | 124.79 | 676.26 |
| अधिक: आरइन्फ्रा-डीच्या ट्रू अप याचिकेनुसार आव 11-12 ची महसुलातील तफावत | 511.64 | 38.68 | 550.32 |
| अधिक: खेळत्या भांडवलावरील व्याजावरील कार्यक्षमता लाभांची पुनर्स्थापना | 48.37 | 27.93 | 76.30 |
| अधिक: पुढे ढकलण्यात आलेल्या भांडवलीकरणाचा परिणाम | 41.12 | 24.30 | 65.42 |
| अधिक: डीएसएम बचतीची पुनर्स्थापना | 4.71 | 3.75 | 8.46 |
| दुय्यम बेरीज - ब | 1,157.31 | 219.45 | 1,376.76 |
| आव 12 पर्यंत एकूण सुधारित महसुलातील संकलित तफावत/नियामक मालमत्ता (क = अ +ब) | 2,661.27 | 1,013.15 | 3,674.72 |

**तक्ता 9: स्वत:च्या/चेंजओव्हर ग्राहकांसाठी प्रस्तावित नियामक मालमत्ता अधिभार**

| तपशील | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|
| आरइन्फ्रा-डीच्या ग्राहकांसाठी नियामक मालमत्ता अधिभार (रु./किवॅतास) | 1.09 | 1.06 | 1.02 |
| चेंजओव्हर ग्राहकांसाठी नियामक मालमत्ता अधिभार (रु./किवॅतास) | 0.92 | 0.88 | 0.83 |

**11. आरइन्फ्रा-डीची एकूण महसुलाची आवश्यकता (कोटी रु.)**

**तक्ता 10: आरइन्फ्रा-डीच्या सयुक्त व्यवसायासाठी (वायर्स+किरकोळ) एकत्रित महसुलाची आवश्यकता (कोटी रु.)**

| अ.क्र. | तपशील | आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|---|
| १ | राज्यांतर्गत पारेषण आकार वगळून वीज खरेदी खर्च | 3523.37 | 3578.84 | 3276.20 | 3446.53 |
| २ | प्रचालन आणि देखभाल खर्च | 938.59 | 943.00 | 1023.87 | 1111.77 |
| ३ | घसाऱ्यासहित अग्रीमासह घसारा | 182.81 | 201.00 | 223.16 | 247.17 |
| ४ | दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | 160.43 | 169.67 | 181.77 | 195.45 |
| ५ | खेळत्या भांडवलावरील व ग्राहक सुरक्षा अनामतीवरील व्याज | 91.29 | 105.85 | 103.78 | 111.39 |
| ६ | राज्यांतर्गत पारेषण आकार | 265.39 | 278.66 | 292.59 | 307.22 |
| ७ | आयकर | 53.87 | 53.87 | 53.87 | 53.87 |
| ८ | आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी | 10.38 | 11.26 | 12.21 | 13.41 |
| ९ | एकूण महसुली खर्च | 5226.12 | 5342.15 | 5167.44 | 5486.81 |
| १० | समभाग भांडवलावरील परतावा | 255.41 | 271.67 | 290.87 | 312.42 |
| ११ | ढोबळ एकत्रित महसुलाची आवश्यकता | 5481.53 | 5613.82 | 5458.31 | 5799.23 |
| १२ | वजा: दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न | 168.83 | 179.91 | 191.74 | 208.62 |
| १३ | वजा: इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न | 5.03 | 5.28 | 5.72 | 6.16 |
| १४ | वजा: सीएसएस वसुलीपासूनचे उत्पन्न | 98.67 | 468.29 | 115.46 | 107.29 |
| १५ | वजा: व्हिलिंगपासूनचे उत्पन्न | 234.67 | 212.94 | 81.56 | 89.75 |
| १६ | अधिक: आव २०१२-१३ ची महसुलातील तफावत | | 340.79 | | |
| १७ | अधिक: टीपीसी-जी आकार | | 84.50 | | |
| | निव्वळ एकत्रित महसुलाची आवश्यकता | 4,974.31 | 5,172.68 | 5,063.82 | 5,387.41 |
| १८ | विक्री (मेयू) | 6346.36 | 6593.68 | 6790.34 | 7020.09 |
| | पुरवठ्याचा सरासरी खर्च (रु./किवॅतास) | 7.84 | 7.84 | 7.46 | 7.67 |

**12. आरइन्फ्रा-डीचा दरपत्रकाचा प्रस्ताव**

**i. दरपत्रकाविषयीचे तात्त्विक विवेचन**

आरइन्फ्रा-डीने दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी दरपत्रकाचा प्रस्ताव मांडताना दरपत्रकविषयक खालील तत्त्वांचा अवलंब केलेला आहे:

- सर्व ग्राहक संवर्गामध्ये स्थिर आकारांचे वाजवीकरण
- ग्राहक संवर्गांमधील क्रॉस सबसिडी कमी करणे आणि दरपत्रकाचे अशा प्रकारे वाजवीकरण करणे ज्यायोगे संबंधित ग्राहक संवर्गाला सेवा देण्यासाठीचा खर्च दिसून येईल.
- जे ग्राहक इतर ग्राहकांना मोठ्या प्रमाणावर क्रॉस सबसिडायझिंग करतात त्या ग्राहक संवर्गांना सूट देण्यासाठी दरपत्रकांमध्ये मोठ्या प्रमाणावरील बदल
- इतर वितरण परवानाधारकांच्या तुलनेत क्रॉस सबसिडायझिंग संवर्गांसाठी शक्य तेवढी अधिक समानता आणणे, ज्यामुळे क्रॉस सबसिडीमुळे होणारा तोटा टळेल व कमी बिल भरण्याची क्षमता असलेल्या ग्राहकांवर होणारा परिणाम टाळला जाईल.
- निवासी संवर्गामध्ये सूट दिलेल्या ग्राहकांवर दरपत्रकाचा परिणाम कमीत कमी होईल याची काळजी घेणे.

**ii. आव 2013-14 ते 2015-16 साठी प्रस्तावित दरपत्रक**

**तक्ता 11: आव 2013-14 ते 2015-16 साठी संवर्ग निहाय प्रस्तावित दरपत्रक**

| तपशील | आव 13-14 | | आव 14-15 | | आव 15-16 | |
|---|---|---|---|---|---|---|
| | स्थि.आ/मा.आ. | वि.आ. | स्थि.आ/मा.आ. | वि.आ. | स्थि.आ/मा.आ. | वि.आ. |
| एलटी 1-दारिद्र्यरेषेखालील | 5 | 0.47 | 5 | 0.47 | 5 | 0.55 |
| एलटी -1 निवासी (सिंगल फेज) | | | | | | |
| 0-100 | 40 | 3.50 | 40 | 3.50 | 40 | 3.74 |
| 101-300 | 75 | 6.57 | 75 | 6.57 | 75 | 6.83 |
| 301-500 | 75 | 10.51 | 75 | 9.25 | 75 | 9.25 |
| 500 व त्यावरील | 150 | 12.23 | 150 | 11.01 | 150 | 11.01 |
| एलटी-1 निवासी थ्री फेज | | | | | | |
| 0-100 | 150 | 3.50 | 150 | 3.50 | 150 | 3.74 |
| 101-300 | 150 | 6.57 | 150 | 6.57 | 150 | 6.83 |
| 301-500 | 150 | 10.51 | 150 | 9.25 | 150 | 9.25 |
| 500 व त्यावरील | 150 | 12.23 | 150 | 11.01 | 150 | 11.01 |
| एलटी 2 (अ)- 0-20 किवॅ | 205 | 9.30 | 205 | 8.81 | 205 | 9.09 |
| एलटी 2(ब) - 20-50 किवॅ | 210 | 10.92 | 210 | 9.28 | 210 | 9.28 |
| एलटी 2 (क) - 50 किवॅ वरील | 210 | 11.60 | 210 | 9.77 | 210 | 9.77 |
| एलटी 3-एलटी औद्योगिक 20 किवॅपर्यंत | 205 | 8.99 | 205 | 8.09 | 205 | 8.09 |
| एलटी 4-एलटी औद्योगिक 20 किवॅ वरील | 205 | 8.58 | 205 | 7.72 | 205 | 7.72 |
| एलटी-5 : एलटी-जाहिराती आणि होर्डिंग्ज | 205 | 19.83 | 205 | 18.78 | 205 | 19.29 |
| एलटी 6: एलटी-पथदीप | 205 | 9.53 | 205 | 9.01 | 205 | 9.26 |
| एलटी-7 (अ): एलटी-तात्पुरता पुरवठा धार्मिक | 205 | 5.49 | 205 | 5.00 | 205 | 5.25 |
| एलटी-7 (ब): एलटी-तात्पुरता पुरवठा इतर | 205 | 18.49 | 205 | 17.31 | 205 | 17.67 |
| एलटी 8: एलटी-दहनभूमी आणि दफनभूमी | 205 | 4.59 | 205 | 4.59 | 205 | 4.77 |
| एलटी 9: एलटी-कृषी | 15 | 0.97 | 15 | 0.97 | 15 | 1.01 |
| एचटी | | | | | | |
| एचटी1: एचटी-औद्योगिक | 210 | 7.59 | 210 | 7.00 | 210 | 7.06 |
| एचटी 2 : एचटी-वाणिज्यिक | 210 | 8.45 | 210 | 7.61 | 210 | 7.61 |
| एचटी 3: एचटी-गृहसंस्था समूह | 210 | 6.25 | 210 | 6.10 | 210 | 6.50 |
| एचटी 4 : एचटी-तात्पुरता पुरवठा | 280 | 12.75 | 280 | 12.11 | 280 | 12.35 |
| एचटी-रेल्वे (नवीन संवर्ग) | 210 | 5.00 | 210 | 5.00 | 210 | 5.25 |

*स्थि.आ.-स्थिर आकार (रु./जोडणी/महिना), मा.आ.-मागणी आकार (रु./किवॅअ/महिना), ब.आ.-बदलता आकार (रु./किवॅतास), वि.आ.-वीज आकार (रु./किवॅतास)

RELIANCE

# सार्वजनिक सूचना

आर्थिक वर्ष 2012-13 ते आर्थिक वर्ष 2015-16 या कालावधीसाठी बहुवर्षीय दरपत्रकाच्या मान्यतेसाठी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड–वितरण व्यवसाय (आरइन्फ्रा–डी) यांनी सादर केलेल्या याचिकेवरील हरकती/सूचना (2013 चे प्रकरण क्र. 9)

**तक्ता 12: आव 2013-14 ते आव 2015-15 साठी दरपत्रकातील संवर्ग निहाय वाढ/घट**

| तपशील | आव 13-14 | | आव 14-15 | | आव 15-16 | |
|---|---|---|---|---|---|---|
| | स्थिर आकार/मागणी आकार यांमधील बदलाची % | ऊर्जा आकारातील बदलाची % | स्थिर आकार/मागणी आकार यांमधील बदलाची % | ऊर्जा आकारातील बदलाची % (गेल्या वर्षाच्या तुलनेत) | स्थिर आकार/मागणी आकार यांमधील बदलाची % | ऊर्जा आकारातील बदलाची % (गेल्या वर्षाच्या तुलनेत) |
| एलटी 1-दारिद्र्यरेषेखालील | 66.7% | 0.0% | 0.0% | 0.0% | 0.0% | 17.0% |
| एलटी -1 निवासी (सिंगल फेज) | | | | | | |
| 0-100 | 33.3% | 0.0% | 0.0% | 0.0% | 0.0% | 6.9% |
| 101-300 | 50.0% | 0.0% | 0.0% | 0.0% | 0.0% | 4.0% |
| 301-500 | 50.0% | -3.0% | 0.0% | -12.0% | 0.0% | 0.0% |
| 500 व त्यावरील | 50.0% | -2.5% | 0.0% | -10.0% | 0.0% | 0.0% |
| एलटी-1 निवासी थ्री फेज | | | | | | |
| 0-100 | 50.0% | 0.0% | 0.0% | 0.0% | 0.0% | 6.9% |
| 101-300 | 50.0% | 0.0% | 0.0% | 0.0% | 0.0% | 4.0% |
| 301-500 | 50.0% | -3.0% | 0.0% | -12.0% | 0.0% | 0.0% |
| 500 व त्यावरील | 50.0% | -2.5% | 0.0% | -10.0% | 0.0% | 0.0% |
| एलटी 2(अ) 0-20 किवॅ | 2.5% | -1.1% | 0.0% | -5.3% | 0.0% | 3.2% |
| एलटी 2(ब) - 20-50 किवॅ | 40.0% | -10.0% | 0.0% | -15.0% | 0.0% | 0.0% |
| एलटी 2(क) - 50 किवॅ वरील | 40.0% | -10.0% | 0.0% | -15.8% | 0.0% | 0.0% |
| एलटी 3-एलटी औद्योगिक 20 किवॅपर्यंत | 2.5% | -2.0% | 0.0% | -10.0% | 0.0% | 0.0% |
| एलटी 4-एलटी औद्योगिक 20 किवॅ वरील | 36.7% | -2.1% | 0.0% | -10.0% | 0.0% | 0.0% |
| एलटी-5: एलटी-जाहिराती आणि होर्डिंग्ज | 2.5% | -5.0% | 0.0% | -5.3% | 0.0% | 2.7% |
| एलटी 6: एलटी-पथदीप | 36.7% | -3.0% | 0.0% | -5.5% | 0.0% | 2.8% |
| एलटी-7 (अ): एलटी-तात्पुरता पुरवठा धार्मिक | 2.5% | 22.0% | 0.0% | -8.9% | 0.0% | 5.0% |
| एलटी-7 (ब): एलटी-तात्पुरता पुरवठा इतर | 2.5% | -1.1% | 0.0% | -6.4% | 0.0% | 2.1% |
| एलटी 8: एलटी-दहनभूमी आणि दफनभूमी | 2.5% | 2.0% | 0.0% | 0.0% | 0.0% | 3.9% |
| एलटी 9: एलटी-कृषी | 0.0% | 2.1% | 0.0% | 0.0% | 0.0% | 4.1% |
| एचटी | | | | | | |
| एचटी 1: एचटी-औद्योगिक | 40.0% | -15.0% | 0.0% | -7.8% | 0.0% | 0.9% |
| एचटी 2: एचटी-वाणिज्यिक | 40.0% | -15.0% | 0.0% | -9.9% | 0.0% | 0.0% |
| एचटी 3: एचटी-गृहसंस्था समूह | 40.0% | 2.5% | 0.0% | -2.4% | 0.0% | 6.6% |
| एचटी 4: एचटी-तात्पुरता पुरवठा | 40.0% | -1.9% | 0.0% | -5.0% | 0.0% | 2.0% |
| एचटी-रेल्वे (नवीन संवर्ग) | NA | NA | 0.0% | 0.0% | 0.0% | 5.0% |

**तक्ता 13: दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी एबीआरच्या तुलनेत एसीओएस (%टर्मस्)**

| तपशील | अस्तित्वातील | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|
| एलटी1-दारिद्र्यरेषेखालील | 13.20% | 16.61% | 17.25% | 17.61% |
| एलटी -1 निवासी (सिंगल फेज) | | | | |
| 0-100 | 46.89% | 47.21% | 49.52% | 51.11% |
| 101-300 | 91.42% | 94.18% | 99.22% | 99.98% |
| 301-500 | 143.25% | 140.84% | 131.09% | 127.23% |
| 500 व त्यावरील | 164.80% | 162.36% | 154.22% | 149.66% |
| एलटी-1 निवासी थ्री फेज | | | | |
| 0-100 | 47.90% | 49.00% | 51.31% | 52.76% |
| 101-300 | 88.00% | 89.49% | 93.95% | 94.50% |
| 301-500 | 142.96% | 140.67% | 130.94% | 127.10% |
| 500 व त्यावरील | 162.46% | 159.35% | 151.18% | 146.81% |
| एलटी 2(अ) 0-20 किवॅ | 129.33% | 127.61% | 127.44% | 127.27% |
| एलटी 2(ब) - 20-50 किवॅ | 164.61% | 152.21% | 137.78% | 133.55% |
| एलटी 2(क) - 50 किवॅ वरील | 173.65% | 159.91% | 143.23% | 138.76% |
| एलटी 3-एलटी औद्योगिक 20 किवॅपर्यंत | 120.53% | 118.07% | 112.06% | 108.82% |
| एलटी 4-एलटी औद्योगिक 20 किवॅ वरील | 118.91% | 118.62% | 113.01% | 109.60% |
| एलटी-5 : एलटी-जाहिराती आणि होर्डिंग्ज | 276.83% | 263.47% | 262.85% | 261.87% |
| एलटी 6: एलटी-पथदीप | 131.88% | 130.90% | 130.52% | 129.89% |
| एलटी-7(अ): एलटी-तात्पुरता पुरवठा धार्मिक | 131.97% | 102.51% | 100.60% | 100.38% |
| एलटी-7(ब): एलटी-तात्पुरता पुरवठा इतर | 239.72% | 236.95% | 233.42% | 231.49% |
| एलटी 8: एलटी-दहनभूमी आणि दफनभूमी | 58.10% | 59.19% | 62.28% | 62.84% |
| एलटी 9: एलटी-कृषी | 12.12% | 12.36% | 13.01% | 13.16% |
| एचटी | | | | |
| एचटी 1: एचटी-औद्योगिक | 120.65% | 105.60% | 102.95% | 100.78% |
| एचटी 2 : एचटी-वाणिज्यिक | 134.81% | 117.78% | 111.81% | 108.10% |
| एचटी 3: एचटी-गृहसंस्था समूह | 82.41% | 85.63% | 87.94% | 90.55% |
| एचटी 4 : एचटी-तात्पुरता पुरवठा | 165.91% | 162.60% | 162.46% | 161.00% |
| एचटी-रेल्वे (नवीन संवर्ग) | - | 71.63% | 75.35% | 75.95% |

**iii. व्हिलिंग आकार आणि क्रॉस-सबसिडी आकार**

**तक्ता 14: दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी क्रॉस-सबसिडी आकार रु./किवॅतास**

| तपशील | आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|
| एलटी 1-दारिद्र्यरेषेखालील | | | | |
| एलटी -1 निवासी (सिंगल फेज) | | | | |
| 0-100 | | | | |
| 101-300 | | | | |
| 301-500 | | 3.54 | 2.24 | 1.96 |
| 500 व त्यावरील | 0.03 | 5.23 | 3.97 | 3.69 |
| एलटी-1 निवासी थ्री फेज | | | | |
| 0-100 | | | | |
| 101-300 | | | | |
| 301-500 | | 3.53 | 2.23 | 1.95 |
| 500 व त्यावरील | | 5.00 | 3.74 | 3.47 |
| एलटी 2(अ) 0-20 किवॅ | | 2.51 | 1.97 | 1.97 |
| एलटी 2(ब) - 20-50 किवॅ | 0.84 | 4.44 | 2.74 | 2.45 |
| एलटी 2(क) - 50 किवॅ वरील | 1.90 | 5.04 | 3.15 | 2.85 |
| एलटी 3-एलटी औद्योगिक 20 किवॅपर्यंत | | 1.76 | 0.83 | 0.55 |
| एलटी 4-एलटी औद्योगिक 20 किवॅ वरील | | 1.80 | 0.90 | 0.61 |
| एलटी-5: एलटी-जाहिराती आणि होर्डिंग्ज | 8.35 | 13.17 | 12.07 | 12.30 |
| एलटी 6: एलटी-पथदीप | | 2.77 | 2.20 | 2.17 |
| एलटी-7 (अ): एलटी-तात्पुरता पुरवठा धार्मिक | | 0.54 | | |
| एलटी-7 (ब): एलटी-तात्पुरता पुरवठा इतर | 5.51 | 11.09 | 9.88 | 9.96 |
| एलटी 8: एलटी-दहनभूमी आणि दफनभूमी | | | | |
| एलटी 9: एलटी-कृषी | | | | |
| एचटी | | | | |
| एचटी 1: एचटी-औद्योगिक | | 1.96 | 1.44 | 1.30 |
| एचटी 2: एचटी-वाणिज्यिक | 0.26 | 2.91 | 2.10 | 1.86 |
| एचटी 3: एचटी-गृहसंस्था समूह | | 0.39 | 0.32 | 0.52 |
| एचटी 4: एचटी-तात्पुरता पुरवठा | 2.22 | 6.43 | 5.88 | 5.92 |
| एचटी-रेल्वे (नवीन संवर्ग) | | | | |

**तक्ता 15: दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी व्हिलिंग आकार रु./किवॅतास**

| तपशील | आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|
| प्रतियुनिट व्हिलिंग आकार - एचटी | 0.46 | 0.83 | 1.00 | 1.04 |
| प्रतियुनिट व्हिलिंग आकार - एलटी | 0.88 | 1.58 | 1.89 | 1.99 |

13. खालील कागदपत्रांच्या प्रती खाली उल्लेख केलेल्या आरइन्फ्रा - डीच्या कार्यालयातून लेखी विनंती केल्यास प्राप्त केल्या जाऊ शकतील:
क. याचिकेचा कार्यकारी सारांश (विनामूल्य, मराठी किंवा इंग्रजी)
ख. सीडीसह (इंग्रजीमध्ये) याचिकेची तपशीलवार कागदपत्रे (रोख रकमेद्वारे किंवा ''रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड'' च्या नावाने काढलेल्या व मुंबई येथे देय असलेल्या डीडी/धनादेशाद्वारे 150/- रुपये भरून)
ग. याचिकेची तपशीलवार कागदपत्रे (इंग्रजीमध्ये) (100/-रुपये भरल्यास)
घ. याचिकेच्या तपशीलवार कागदपत्रांची सीडी (इंग्रजीमध्ये) (50/-रुपये भरल्यास)

**कार्यालय:**

| **कार्यालय** | **पत्ता** | **फोन/फॅक्स क्र.** |
|---|---|---|
| नोंदणीकृत व मुख्य कार्यालय | एच–ब्लॉक, 1 ला माळा, धीरुभाई अंबानी नॉलेज सिटी, नवी मुंबई–400 710. | फोन:+91-22-3038 6101<br>फॅक्स:+91-22-3037 6622/23 |
| कार्यालय | देवीदास गल्ली, एसव्हीपी रोडलगत, देवीदास दूरध्वनी केंद्राजवळ, बोरीवली (प), मुंबइ–400 092. | फोन:+91-22-3009 9999<br>फॅक्स:+91-22-3009 8799 |
| उत्तर विभाग | 369 डी, शंकर गल्ली आणि एस. व्ही. मार्ग यांचे जंक्शन, कांदिवली (प), मुंबई–400 067. | फोन:+91-22-3009 6999<br>फॅक्स:+91-22-3009 4580 |
| मध्य विभाग | पश्चिम द्रुतगती महामार्ग, पटेल अॅल्युमिनिअमसमोर, दिंडोशी, गोरेगाव (पू), मुंबई–400 097. | फोन:+91-22-3009 6999<br>फॅक्स:+91-22-3009 4844 |
| दक्षिण मध्य विभाग | ई–4, एमआयडीसी, अंधेरी (पू), मुंबई–400 093. | फोन:+91-22-3009 6999<br>फॅक्स:+91-22-3009 4200 |
| दक्षिण विभाग | आरएनए कॉर्पोरेट पार्क, जुने कलामंदिर, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, वांद्रे (पू), मुंबई–400 051. | फोन:+91-22-3009 6999<br>फॅक्स:+91-22-3009 6263 |
| पूर्व विभाग | सहकार सिनेमाजवळ, टिळक नगर, रस्ता क्र. 3, चेंबूर, मुंबई–400 089. | फोन:+91-22-3009 6999<br>फॅक्स:+91-22-3009 2022 |

14. आयोगाने आरइन्फ्रा- डीला या सूचनेच्या माध्यमातून वरील याचिकेच्या संदर्भात लोकांकडून सूचना व हरकती मागविण्याचे निर्देश दिलेले आहेत. अशा सूचना व हरकती सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, 13 वा माळा, सेंटर क्र. 1, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई-400 005 (फॅक्स:22163976, ई-मेल: mercindia@mercindia.org.in) यांच्याकडे. सोमवार, 1 एप्रिल 2013 पर्यंत श्री. कपिल शर्मा, नियामक कामकाज, 7 वा माळा, देवीदास लेन, एसव्हीपी रोडलगत, देवीदास दूरध्वनी केंद्राजवळ, बोरीवली (प), मुंबई- 400 092 यांना त्यांची प्रत पाठविल्याच्या पुराव्यासह पाठवाव्यात.
15. अशा सूचना किंवा हरकती दाखल करण्याची इच्छा असलेली प्रत्येक व्यक्ती, त्या इंग्रजी किंवा मराठी भाषेत, सहा प्रतींमध्ये सादर करू शकेल आणि त्यामध्ये तिचे पूर्ण नाव, टपालासाठी पत्ता आणि असल्यास ई-मेल आयडी दिलेला असावा. सूचना/हरकती एखादी संस्था किंवा ग्राहकांच्या गटाकडून सादर केलेल्या आहेत किंवा काय त्याचा निर्देश केलेला असावा. अशा सूचना/हरकती पाठविणाऱ्या व्यक्तीची वैयक्तिक सुनावणी करण्याची इच्छा आहे किंवा काय ह्या बाबत निर्देश करावा, तसे असल्यास आयोगाकडून रंगशारदा नाट्यमंदिर, वांद्रे (प), मुंबई–400 050 येथे शनिवार, 6 एप्रिल 2013 रोजी 10.00 वाजता आयोजित करण्यात येणाऱ्या सार्वजनिक सुनावणीच्या वेळी संधी दिली जाईल व त्यासाठी स्वतंत्र सूचना दिली जाणार नाही.
16. अशा प्रकारे सर्व प्रकारच्या हरकती आणि टीका-टिप्पणी/सूचनांसाठी दिनांक सोमवार, 1 एप्रिल 2013, पर्यंत प्राप्त झालेल्या सूचनांना आणि हरकतींना आरइन्फ्रा-डी त्या प्राप्त झाल्यानंतर तीन दिवसांच्या आत परंतु गुरूवार, 4 एप्रिल 2013, पूर्वी उत्तर पाठवील. आरइन्फ्रा-डीने दिलेल्या उत्तरांवर लाभार्थी त्यांचे जोडअर्ज एकतर सार्वजनिक सुनावणीच्या वेळी किंवा उशिरात उशिरा दिनांक बुधवार, 10 एप्रिल 2013 पूर्वी सादर करू शकतील.
17. याचिकेची तपशीलवार कागदपत्रे आणि सारांश आरइन्फ्रा-डीच्या www.rinfra.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत आणि कार्यकारी सारांश आयोगाच्या www.mercindia.org.in/www.merc.gov.in या संकेतस्थळावरही डाऊनलोड करून घेण्यायोग्य रूपात उपलब्ध आहेत (विनामूल्य).

सही
रमेश शेणॉय
कंपनी सचिव
रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड